# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०३-०१-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ०३ जानेवारी २०१८ रोजी (का.प.क्र. ०५) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.०५ वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग,नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १५. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १६. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १७. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १८. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १९. | स.स. श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| २०. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २१. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २२. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २३. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २४. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २५. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २६. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २७. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| २८. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| २९. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ३०. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |

इति.विशेष सर्व साधारण सभा
दिनांक ०३-०१-२०१८
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०५)

| | |
|---|---|
| ३१. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३२. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ३३. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ३४. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ३५. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ३६. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ३७. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ३८. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ३९. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ४०. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ४१. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ४२. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४३. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ४४. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ४५. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ४६. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ४७. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ४८. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ४९. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ५०. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ५१. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ५२. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ५३. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव

मा.महापौर :आजची ही विशेष सर्वसाधारण सभा स.स्थायी समितीचे सदस्य श्री.रुपचंद वाघमारे, श्री.राजगौरव वानखेडे, श्रीमती.किर्ती शिंदे, श्री.सिध्दांत सिरसाठ या सदस्याच्या विनंती वरुन आयोजीत केली आहे. या सभेसाठी शहरातील विकास योजना रस्त्याने बाधीत मालमत्ता निष्काषीत करणे, रस्त्यावर अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हातगाडयांवर तसेच रस्त्यात जे अतिक्रमण बाधीत झालेले आहेत. या विषयावर चर्चा करणे तसेच अतिक्रमण विभाग यांनी जे नियोजन केले व त्या कार्यवाही संदर्भात एक Action plan तयार केलेला आहे. या सर्व बाबतीत आढावा घेणे. या करिता आजची विशेष सर्वसाधारण सभा आयोजीत करण्यात आली आहे. या सभेच्या निमित्ताने स.पदाधिकारी व स.सदस्य, पत्रकार व अधिकारी या सर्वांचे मनपुर्वक स्वागत.

श्री.विकास जैन :मनपाचे कर्मचारी श्री.प्रकाश राजपुत यांच्या मातोश्री पुनयाबाई राजपुत यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्रीमती सिमा खरात :स.नगरसेविका श्री.सिमा चक्रनारायण यांच्या सासुबाई सत्यभामाबाई चक्रनारायण यांचे दु:खद निधन झालेले आहेत. त्यांना ही श्रध्दाजंली अर्पण करावी.

(जी सुचना मांडली या प्रस्तावास श्री.कैलास गायकवाड, श्री.रेणुकादास वैद्य, श्रीमती शिल्पाराणी वाडकर,श्री.गजानन बारवाल यांनी अनुमोदन दिले.)

श्री.कैलास गायकवाड :कोरेगाव भिमा या ठिकाणी जी घटना घडली दंगल ग्रस्त परिस्थिती निर्माण झाली. त्यामध्ये महिला भगीनींचा मुत्यु झाला. त्यांना या ठिकाणी श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्रीमती सिमा खरात :जो प्रस्ताव मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

श्री.प्रमोद राठोड :जो प्रस्ताव मांडला आहे. त्याला आमचे अनुमोदन आहे.

मा.महापौर :जो श्रध्दाजंलीचा प्रस्ताव ठेवला. त्यानुसार स्व.पुनयाबाई राजपुत, स्व.सत्यभामाबाई चक्रनारायण यांना तसेच कोरेगाव भिमा या घटनेत मुत्यूमुखी पडलेल्याना तसेच महानगरपालिकेचे उपअभियंता श्री.काशीनाथ फालक यांच्या मातोश्री व श्री.ए.बी.देशमुख यांचे बंधुचे निधन झाले या सर्वाना सभागृहाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दाजंली अर्पण करण्यात येते. सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

(या वेळी स्व.पुनयाबाई राजपुत, स्व.सत्यभामाबाई चक्रनारायण, भिमा कोरेगाव दुर्घटनेत मुत्यू झालेले तसेच श्री.फालक यांच्या मातोश्री व श्री.देशमुख यांच्या बंधुना सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्या संदर्भात आजची बैठक आयोजीत केली होती,हा महत्त्वाचा विषय आहे. यामुळे शहरातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडु शकते सभेला मा.आयुक्तही उपस्थित नाहीत. मा.आयुक्त जर नसतील तर चर्चा करुन काही फायदा नाही. मा.आयुक्तांच्या उपस्थितीत ही बैठक घेण्यात यावी .

श्री.नासेर सिद्दीकी :१ जानेवारी २०१८ ला कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली. त्याचा आम्ही निषेध करतो त्यामुळे शहरातील वातावरण आजच्या घडीला खराब आहे. आज महाराष्ट्र बंद घोषित आहे शहरातही बंद पाळण्यात येत असल्यामुळे ही बैठक नंतर घेण्यात यावी.

श्री.कैलास गायकवाड :कोरेगाव भिमा या ठिकाणी १ जानेवारी २०१८ ला जी घटना घडली तसेच संपुर्ण महाराष्ट्रात दंगलीची परिस्थिती निर्मण झाली. औरंगाबादमध्ये सिध्दार्थ नगर, संजय नगर, मुकुंदवाडी,उस्मानपुरा या ठिकाणी काही घटना घडल्या,पोलीसांनी कोंम्बींग ऑपरेशन सुरु केले अशा परिस्थितीत स.सदस्य वॉर्डमध्ये शांतता ठेवण्यासाठी उपस्थित असायला पाहीजे,भिमा कोरेगाव येथे जी घटना घडली त्याचा निषेधाचा ठराव मंजुर करावा व आजची बैठक तहकुब करावी.

श्रीमती ज्योती अभंग :१ जानेवारी २०१८ ला कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली आहे आणि आज महाराष्ट्रात बंद पाळण्यात येत आहे. तसेच शहरातील वातावरण खराब आहे. जनतेचा विचार करुन आजची सभा तहकुब करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :कोरेगाव भिमा येथील घटना झाली व संपुर्ण महाराष्ट्र मध्ये दंगल उसळली. जाळपोळीच्या घटना घडल्या याचा जाहीर निषेध नोंदवावा

दिनांक २८ डिसेंबरला जे दमडी महल येथील श्री.श्रीराम पवार यांचे घर पाडण्यात आले. विकास कामामध्ये येत असेल तर काढले पाहिजे त्याचे समर्थन करणार आहे. मात्र ज्या पध्दतीने प्रशासनाने घर पाडले व त्यानंतर फटाके फोडण्यात आले. त्याचा जाहीर निषेध नोंदवाव व त्या प्रकरणाचा अहवाल सभागृहा समोर ठेवावा.

श्री.प्रमोद राठोड :कोरेगाव भिमा येथील झालेली घटना त्याचा आम्ही निषेध करतो. व आज महाराष्ट्र बंद असल्यामुळे आणि शहरातील वातावरण तणावग्रस्त असल्यामुळे प्रत्येक वॉर्ड मध्ये स.सदस्यांनी जाऊन शांतता ठेवणे गरजेचे आहे. आज मा.आयुक्तही उपस्थित नाहीत आणि अतिक्रमण काढतेवेळी पथकाकडून व सदस्यांनी जो गैरवापर केला आहे. त्या बद्दलचा अहवाल पूढे जेव्हा केंव्हा सभा होईल त्यावेळी ठेवावा. आजची सभा तहकुब करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :कोरेगाव भिमा येथील अभिवादन करण्यासाठी राज्यातुन हजारो लोक गेले होते. तीथे काही कारणास्तव दंगल उसळली त्या दंगल मध्ये अनेक महिलांना मारहाण, दगड फेक करण्यात आली, याचे समर्थन कोणीही करु शकत नाही. जी घटना भिमा कोरेगाव येथे घडली आहे, त्याचा आम्ही निषेध करतो. आणि आजची सभा तहकुब करण्यात यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:कोरेगाव भिमा येथील जी घटना घडली आहे. त्या प्रकरणाचा आम्ही जाहीर निषेध करतो. शहरातील दमडी महल येथे श्री.श्रीराम पवार यांचे घर पाडल्या नंतर जे फटाके फोडण्याचा प्रकार घडला आहे. त्याचा मी जाहीर निषेध करते.

श्री.भाऊसाहेब जगताप :कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली त्याचा आम्ही निषेध करतो. आज शहरातील वातावरण विचारात घेता, आजची सभा तहकुब करण्यात यावी.

श्री.गंगाधर ढगे :१ जानेवारीला कोरेगाव भिमा येथे या ठिकाणी शौर्य दिन साजरा केला जातो. परंतु काही समाज कंटकानी अहमदनगर ते पुणे मार्गावर दलित समाजाच्या गाडयांवर दगड फेकुन काचा फोडण्याचे, जाळण्याचे प्रकार केले. महिलांना मारण्याचे काम केले. त्या नंतर औरंगाबाद शहरामध्ये सिध्दार्थ नगर, उस्मानपुरा, हर्सुल, जयभवानीनगर, घाटी टाऊन हॉल या भागामध्ये पोलीसांनी लाठी चार्ज करुन दलित समाजाच्या लोकांना जखमी केलेले आहेत. या घटनेचा निषेध करावा.

श्रीमती सीमा खरात :दिनांक १-१-२०१८ रोजी कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली आहे. १८१८ शौर्याना मानवंदना देण्याला २०० वर्षे पुर्ण झाल्यामुळे तेथे खुप दलित समाजाचे लोक शौर्य दिन साजरा करावयास गेले असता तेथे जी काही घटना घडली, त्यांचा आम्ही जाहीर निषेध करतो.

श्री.अफसर खॉन :कोरेगाव भिमा येथील जी घटना घडली आणि त्याचा परिणाम पुर्ण महाराष्ट्र मध्ये झाला. त्याचा आम्ही जाहीर निषेध करतो, विदयापीठ गेट ते जयसिंगपूरा चौक पर्यंत अनेक लोकांनी २-४-६ फुट पूढे येऊन रस्त्यात अतिक्रमण केले त्या बाबत कार्यवाही करावी व सदस्यांच्या सूचने नुसार आजची सभा तहकुब करावी.

श्री.विकास जैन :कोरेगाव भिमा येथील जी घटना घडली आहे. त्यासाठी सर्वांनी निषेधाचा ठराव मांडला आहे. आज अतिक्रमण विषयावर बैठक होती आणि मा.आयुक्तही उपस्थित नसल्यामुळे ही बैठक तहकुब करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली आहे. त्याचा निषेध करतो.

श्री.सय्यद मतीन :शहरात विकासाचे कामे होत नाहीत. ती तातडीने सुरु करावे. अनेक संचिका मा.आयुक्ताकडे प्रलंबीत आहे.

श्री.जहागीर खान :शहरात विकासाची कामे होत नाही यावर लक्ष दिले जावे.

श्रीमती समिना शेख :कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली आहे. त्याचा आम्ही जाहीर निषेध करतो. त्या घटनेने शहराचे वातावरण खराब आहे. त्यामुळे आजची सभा तहकुब करण्यात यावी. मा.आयुक्तांकडे अनेक विकास कामाच्या संचीका प्रलंबीत आहे त्या मंजुर करण्याबाबत आदेशीत करावे.

मा.उपमहापौर :कोरेगाव भिमा येथील घटनेच्या संदर्भात निषेधचा ठराव सदस्यांने मांडला जो प्रकार घडला तो निदंनीय आहे. आणि श्री.श्रीराम पवार यांच्या अतिक्रमणाच्या बाबतीत जो प्रकार घडला आहे तो निदंनीय आहे. आजच्या सभेला मा.आयुक्त उपस्थित नाहीत आणि ज्या दिवशी मा.आयुक्त उपस्थित असू शकतील त्या दिवशी बैठक घेण्यात यावी, सर्वाच्या सुचने नुसार आजची सभा तहकुब करण्यात यावी.

(त्यावेळी श्री.अभंग, पदनिर्देशीत अधिकारी-अतिक्रमण हे सभागृहात येतात.)

मा.महापौर :यापुढे अधिकारी यांनी सभागृहात उशीरा येऊ नये, कोरेगाव भिमा येथे जी घटना घडली त्या अनुषंगाने सगळयांच्या भावना लक्षात घेऊन आणि तसेच स.आयुक्त हे नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे बैठकीचे आयोजन असल्याने गेलेले आहे. त्यांनी विनंती केली की, आजच्या सभेला उपस्थित राहु शकणार नाही. मा.आयुक्ताकडे जी जी कामे प्रलंबीत असतील ती मंजुर करुन घेऊ आणि आजची सभा ही विकास रस्ता रुंदीकरण, अतिक्रमण असतील, डि.पी. रोडचे अतिक्रमण असतील, त्याच प्रमाणे अतिक्रमण विभागाने केलेले नियोजन आणि केलेला Action Plan यावर चर्चा करण्यासाठी होती. या विभागास मी सुध्दा आदेशित केले होते की, शहरातील डि.पी. रस्ते मोकळे करण्यात यावे. त्या रस्त्यावर लोकांनी अतिक्रमण करुन व्यवसाय सुरु केले. अतिक्रमण विभागाचे नियोजन व सदस्यांच्या सुचना विचारात घेतल्या जातील या दृष्टीने ही सभा आयोजीत केली आहे आणि दमडी महल येथील श्री.श्रीराम पवार यांच्या घराच्या संदर्भात मा.आयुक्त यांच्याशी चर्चा केली आहे आणि त्यांचा अहवाल सुध्दा या सभागृहा मध्ये येणे अपेक्षीत होता, मा.आयुक्त यांनी यासाठी दोन दिवसाचा कालावधी वाढवुन घेतलेला आहे, या दोन दिवसामध्ये संपुर्ण प्रकरणाचा अहवाल आपल्या सभागृहासमोर सादर करणार आहेत. मी स्वतः ही Video Clip बघीतलेली आहे. सदस्यांने केलेल्या सूचनेनुसार आजची सभा तहकुब करण्यात येते ही सभा दिनांक ०६.०१.२०१८ ला आयोजीत करण्यात येईल. कोरेगाव भिमा येथे १ जानेवारीला जी घटना घडली त्या घटनेमध्ये सन-१८१८ मध्ये जी लढाई झाली होती. त्या लढाई मध्ये धारा तिर्थ पडलेल्या सैनिकांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यास २०० वर्षे पुर्ण

इति.विशेष सर्व साधारण सभा
दिनांक ०३-०१-२०१८
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०५)

झाली आणि संपुर्ण देशातील भाविक लोक तेथे विजय स्तंभला अभिवादन करण्यासाठी गेले होते. तेथे जी घटना घडली अशोभनीय आहे. त्या प्रकरणात काही भगींनी मृत्यूमुखी पडल्या आणि त्या घटनेच्या सभागृहाच्या माध्यमातुन निषेध करतो, शहरामध्ये दोन दिवसा पासून तणावग्रस्त परिस्थिती दिसुन येते अनेक घटना घडल्या ही सभा आगोदर लावली होती, घटना नंतर घडली कोणीही गैर समज करुन घेऊ नये आणि सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन ही सभा तहकुब करण्यात येत आहे.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद